RNI No. MAHBIL/2009/35529

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ३१] गुरुवार ते बुधवार, जुलै ३१-ऑगस्ट ६, २०२५/श्रावण ९-१५, शके १९४७ [पृष्ठे ५०, किंमत रुपये : १४.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक न्या.अ. ४९०२/२०२५.— श्री. एस. डी. भगत, जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग यांची दिनांक २ जुलै २०२५ ते दिनांक ४ जुलै २०२५ रोजीची तीन दिवसांची अर्जित रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एस. डी. भगत, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एस. डी. भगत, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. एस. डी. भगत, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे होता.

राजेंद्र द. सावंत,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२५.

जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक न्या.अ. ४८९९/२०२५.— श्रीमती ए. एच. ठाकूर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग यांची दिनांक ५ मे २०२५ ते दिनांक ८ मे २०२५ अशी एकूण ४ दिवसांची अर्जित रजा मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती ए. एच. ठाकूर, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ४थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती ए. एच. ठाकूर, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ४थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्रीमती ए. एच. ठाकूर, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे असेल.

राजेंद्र द. सावंत,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२५.

जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक न्या.अ. ४९००/२०२५.— श्री. ए. ए. शिंदे, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, अलिबाग यांची दिनांक ७ जुलै २०२५ ते दिनांक ११ जुलै २०२५ अशी एकूण ५ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक ६ जुलै २०२५ रोजीचा रविवार सुट्टी व पुढील दिनांक १२ जुलै २०२५ व दिनांक १३ जुलै २०२५ रोजीचे दुसरा शनिवार, रविवार सुट्टीस जोडून तसेच दिनांक ५ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १४ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. ए. ए. शिंदे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. ए. ए. शिंदे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. ए. ए. शिंदे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढण्यात यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

राजेंद्र द. सावंत,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३६५०/२०२५.—उपरोक्त नमूद संदर्भान्वये रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-यांचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित रजा	अर्जित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एस. वाय. शेख, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी.	९९ दिवस अर्जित रजा.	दिनांक ३० जून २०२५ ते दिनांक २ जुलै २०२५ तीन दिवस अर्जित रजा.	दिनांक २८ जून २०२५ व दिनांक २९ जून २०२५ रोजीच्या सुट्ट्या दिनांक २७ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ३ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती ए. ए. कुलकर्णी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी यांचेकडे. *

* श्रीमती एस. वाय. शेख, २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी यांचेकडे असलेल्या श्रीमती ए. डी. गाडे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी यांचे पदभारासह ठेवणेत येत आहे.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबंधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २४ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक बी-२/३७२३/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेले खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती ए. ए. कुलकर्णी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी.	७० दिवस अर्जित रजा.	दिनांक ७ जुलै २०२५ व दिनांक ११ जुलै २०२५ रोजीची पाच दिवसांची अर्जित रजा.	दिनांक ६ जुलै २०२५, दिनांक १२ जुलै २०२५ व दिनांक १३ जुलै २०२५ रोजीच्या सुट्ट्या दिनांक ५ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १४ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती एस. वाय. शेख, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी यांचेकडे. *

* दिनांक ५ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १० जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत व दिनांक ११ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक १४ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत ठेवणेत येत आहे. तसेच दिनांक १० जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक ११ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत श्रीमती ए. डी. गाडे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, रत्नागिरी यांचेकडे ठेवणेत येत आहे.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबंधी त्यांचे न्यायालयाशी सलंग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २६ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३७२४/सन २०२५.—उपरोक्त नमूद संदर्भान्वये रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे परिवर्तित रजेचा अर्ज, कार्योत्तर मंजूर करणेत येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. जी. डी. पाटील, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, खेड.	७७ दिवस परिवर्तीत रजा.	दिनांक २० जून २०२५ ते दिनांक २३ जून २०२५ रोजीची चार दिवस परिवर्तित रजा.	. . . . . दिनांक २० जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २४ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. जी. एस. दिवाण, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, खेड.

सदर आदेशाची माहिती संबंधित न्यायिक अधिकारी यांना देण्यात यावी.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २६ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३७२५/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा, सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितल्याचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. एम. व्ही. तोकले, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड.	२४२ दिवस अर्जित रजा.	दिनांक ३० जून २०२५ ते दिनांक २ जुलै २०२५ पर्यंतची तीन दिवस अर्जित रजा.	दिनांक २८ जून २०२५ व दिनांक २९ जून २०२५ रोजीच्या सुट्ट्या. दिनांक २७ जून २०२५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ३ जुलै २०२५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. जी. एस. दिवाण, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, खेड.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २६ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३५५७/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आलेला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एच एस. भोसले, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी.	१९७ दिवस अर्जित रजा.	दिनांक १६ जून २०२५ ते दिनांक १८ जून २०२५ रोजीची तीन दिवस अर्जित रजा.	. . . . . दिनांक १६ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक १९ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. एस. जी. बावकर, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य, न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे.

दिनांक १६ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक १७ जून २०२५ रोजीचे दुपारसत्रापर्यंत व दिनांक १८ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक १९ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत पदभार ठेवणेत आला होता. तसेच श्रीमती व्ही. व्ही. पाटील, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे दिनांक १७ जून २०२५ रोजीचे दुपारसत्राचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक १८ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत पदभार ठेवणेत आला होता.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक १९ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था/बी-२/३५९७/सन २०२४.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. पी. एस. चांदगुडे, जिल्हा न्यायाधीश-१, व अति. सत्र न्यायाधीश, खेड.	२८५ दिवस अर्जित रजा.	दिनांक २३ जून २०२५ ते दिनांक २५ जून २०२५ तीन दिवस अर्जित रजा.	. . . . . दिनांक २३ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २६ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती ए. एस. नेवसे, जिल्हा न्यायाधीश-१, व अति. सत्र न्यायाधीश, चिपळूण, यांचेकडे.*

* न्यायिक कामाचा पदभार ठेवणेत येत आहे. तसेच सदर कालावधीतील प्रशासकीय कामाचा पदभार (आहरण व संवितरण अधिकारी यासह) श्री. एम. व्ही. तोकले, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, खेड यांचेकडे ठेवण्यात येत आहे.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबंधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २१ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३५९९/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, सुट्टी उपभोगणे व मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितल्याचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एच. एस. भोसले, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी.	१९४ दिवस अर्जित रजा.	दिनांक २३ जून २०२५ ते दिनांक २७ जून २०२५ रोजीची पाच दिवस अर्जित रजा.	दिनांक २२ जून २०२५, दिनांक २८ जून २०२५ व दिनांक २९ जून २०२५ रोजीच्या सुट्ट्या दिनांक २१ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ३० जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. एस. जी. बावकर, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी मुख्यालयात हजर झाल्याचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २१ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३६००/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. बी. एस. संकपाळ, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.	२३५ दिवस अर्जित रजा.	दिनांक १६ जून २०२५ ते दिनांक १८ जून २०२५ तीन दिवसांची अर्जित रजा.	दिनांक १४ जून २०२५ व दिनांक १५ जून २०२५ रोजीच्या सुट्ट्या दिनांक १३ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १९ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. पी. एस. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी हजर झाल्याचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकारी यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २१ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३६०३/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, कार्योत्तर मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती आर. ए. नेमाडे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दापोली.	६९ दिवस अर्जित रजा.	दिनांक १९ जून २०२५ रोजीची एक दिवसाची वाढीव अर्जित रजा (दिनांक १६ जून २०२५) ते दिनांक १८ जून २०२५ रोजीच्या तीन दिवसांच्या अर्जित रजेला जोडून)	. . . . . दिनांक १९ जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २० जून २०२५ कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती पी. एस. वारके, सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दापोली.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २१ जून २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३९६१/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एच. एस. भोसले, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी.	१९९ दिवस अर्जित रजा.	दिनांक ८ जुलै २०२५ ते दिनांक १० जुलै २०२५ रोजीची तीन दिवस अर्जित रजा.	. . . . . . दिनांक ८ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक ११ जुलै २०२५ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. एस. जी. बावकर, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति मुख्य. न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ७ जुलै २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३८०२/सन २०२५.—रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज, सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/परिवर्तित रजा	अर्जित/परिवर्तित रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एच. एस. भोसले, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, रत्नागिरी.	१८९ दिवस अर्जित रजा.	दिनांक १ जुलै २०२५ ते दिनांक ५ जुलै २०२५ रोजीची पाच दिवस अर्जित रजा.	दिनांक ६ जुलै २०२५ रोजीची सुट्टी. दिनांक १ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक ७ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. एस. जी. बावकर, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक १ जुलै २०२५.

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक आस्था बी-२/३८७१/सन २०२५.—उपरोक्त नमूद संदर्भान्वये रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे परिवर्तीत रजेचा अर्ज वैद्यकीय प्रमाणपत्राआधारे कार्योत्तर मंजूर करणेत येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत आला होता :—

अ. क्र.	न्यायिक अधिका-याचे नाव व पदनाम	शिल्लक परिवर्तीत रजा	परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. पी. एस. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.	१६३ दिवस परिवर्तीत रजा.	दिनांक ३० जून २०२५ ते दिनांक १ जुलै २०२५ रोजीची दोन दिवस परिवर्तीत रजा.	. . . . . दिनांक ३० जून २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपासून ते दिनांक २ जुलै २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्री. बी. एस. संकपाळ, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

सदर आदेशाची माहिती संबंधित न्यायिक अधिकारी यांना देण्यात यावी.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिका-यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

एस. एस. गोसावी,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ४ जुलै २०२५.

जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (नागरी क्षेत्र कमाल धारणा) बृहन्मुंबई यांजकडून

अधिसूचना

क्रमांक सी/युएलसी/डे-V/६(१)/SR-XIII-९२६/कावि-४७/२०२५/जा.क्र. ८६७.— ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** दिनांक ३ ऑगस्ट २००० च्या कोकण विभागीय पुरवणीत पृष्ठ क्रमांक १३९० वर प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेत श्री. नारायण लक्ष्मण भंडारी व इतर यांनी धारण केलेली मौजे कांदिवली, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. ६६८पै मधील क्षेत्र ४११ चौ.मी. ही मिळकत कमाल मर्यादेपेक्षा अधिक असल्यामुळे ती जमीन महाराष्ट्र शासनाद्वारे संपादित केली जावयाची आहे. हे नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम १० पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित करण्यात आले होते. तद्नंतर कलम ८(४) चे आदेशास, सुधारित आदेश दिनांक १३ एप्रिल २००४ रोजी पारित करून मौजे कांदिवली, ता. बोरीवली येथील येथील न.भू.क्र. ६६८ पै मधील ३०२.८० चौ.मी. क्षेत्र अतिरिक्त घोषित करणेत आले. त्यानंतर सदर जमीन सर्व भारांपासून मुक्त अशी महाराष्ट्र शासनाकडे सर्वार्थाने निहीत होईल असे **महाराष्ट्र शासन राजपत्र,** दिनांक २६ जानेवारी २००६ च्या कोकण विभागीय पुरवणीत पृष्ठ क्र. ६५ वर प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेत उक्त अधिनियमाच्या कलम १० पोट-कलम (३) प्रमाणे अधिसूचित करण्यात आले आहे ;

ज्याअर्थी, ना.ज.क.धा. अधिनियमांतर्गत कलम १० पोट-कलम (१), (३) व (५) अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. कलम १० पोट-कलम (३) व पोट-कलम (५) च्या कार्यवाहीच्या अनुषंगाने विवरणपत्रधारक श्री. नारायण लक्ष्मण भंडारी यांनी धारण केलेल्या खालील अनुसूचित नमूद जमिनीच्या अधिकार अभिलेखातील भोगवटादार सदरी तसेच इतर हक्कात ' महाराष्ट्र शासन ' अशी नोंद घेण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन पत्र दिनांक ५ मार्च २०२५ अन्वये प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक २८ डिसेंबर २०२१ मधील मुद्दा क्र. (ब) मधील तरतुदीनुसार विहित अधिमुल्य शासनास भरणा केल्याने मौजे कांदिवली, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. ६६८पै मधील ३०२.८० चौ.मी. या क्षेत्राकरिता ना.ज.क.धा. कलम १०(३) व १०(५) नुसार दाखल केलेली मिळकत पत्रिकाधारक सदरी ' महाराष्ट्र शासन ' ही नोंद कमी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याअर्थी, उपरोल्लिखीत **महाराष्ट्र शासन राजपत्र,** दिनांक २६ जानेवारी २००६ च्या कोकण विभागीय पुरवणीत पृष्ठ क्रमांक ६५ वर प्रसिद्ध झालेली ना.ज.क.धा. कलम १०(३) ची अधिसूचना खालील नमूद क्षेत्राकरिता रद्द करण्यात येत आहे.

अनुसूची

अ.क्र.	जिल्हा	गाव	तालुका	न.भू.क्र.	क्षेत्र (चौ.मी.)
१	मुंबई उपनगर	कांदिवली	बोरीवली	६६८	३०२.८०
				एकूण	**३०२.८०**

सतिश बागल,
जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
(ना.क्षे.क.धा.) बृहन्मुंबई.

वांद्रे (पूर्व), मुंबई,
दिनांक ८ जुलै २०२५.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, दापोली यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक भूसंपादन/नवीन कायदा-२०१३/अधिसूचना/करंजाळी/६१८/०६/२०२५.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क व अधिनियम, २०१३ (३० चा २०१३) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, दापोली यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची—एक

जमिनीचे वर्णन

एलएक्यु/एसआर/करंजाळी/६१८

गाव मौजे करंजाळी, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी.

अनुक्रमांक	गट नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये)
१	३३५	०.१७.००
२	३३४	०.२५.००
३	५५४	०.५२.००
४	५५७	०.३१.००
५	५५८	०.०४.००
६	५६५ अ	०.४६.००
७	५६५ ब	०.१७.००
८	५७२	०.२०.००
९	५७४	०.३२.००
१०	५७८	१.२३.००
११	५७९	०.१०.००
१२	५८०	०.०८.००
१३	५८१	०.०३.००
१४	५८५	०.४८.००
१५	५८४	०.६६.००
१६	५८२	०.२३.००
१७	५८३	०.३८.००
१८	९८०	०.२७.००
१९	५५०	०.२५.००
२०	५५६	०.१६.२०
२१	५५५	०.०१.३०
२२	५५३	१.६२.००
२३	५४९	०.२०.००
२४	५४८	१.३६.००
२५	५४४	०.०४.००
२६	५८६	०.२५.००
२७	५७१	०.०५.००
	एकूण	**९.८४.५०**

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- ल.पा. योजना धरणस्थळ, बुडीत क्षेत्र प्रवेशा व पुच्छ कालव्यासाठी, मौजे करंजाळी, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- ल.पा. योजना, ता. दापोली, जि. रत्नागिरी, या योजनेच्या मौजे करंजाळी गावातील धरणस्थळ, बुडीत क्षेत्र प्रवेश व पूच्छ कालव्यासाठी भूसंपादन प्रस्ताव.

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पामुळे शेतीसाठी, बागायतीसाठी पाणी उपलब्ध होईल तसेच विहीरी, नदी, नाले यांना पाण्याचा स्त्रोत वाढेल, सार्वजनिक पाणीपुरवठा उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- ल.पा. योजना, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी या योजनेच्या मौजे करंजाळी गावातील धरणस्थळ, बुडीत क्षेत्र प्रवेश व पुच्छ कालव्यासाठी असून सदर भूसंपादन क्षेत्रामध्ये एकही खातेदाराचे कोणतेही घर बाधित होत नाही. त्यामुळे सदर भूसंपादन प्रस्तावास कुटुंबियांचे पुनर्वसनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

अनुसूची-चार

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

भाकर सेवा संस्था लांजा यांचेमार्फत करंजाळी/६१८ ता. दापोली, ल.पा. योजनेचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल दिनांक ३ मार्च २०२० रोजी प्राप्त झाला आहे. भूसंपादनास बहुतांश लोकांची संमती असल्याचे तसेच या प्रकल्पामुळे कोणतेही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाहीत. धरणाचे काम पूर्ण झाल्यावर शेतीवाडी बागायतीसाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच विहीरी व नदीनाल्यांचा पाण्याचा स्त्रोत वाढेल असा अहवाल देण्यात आलेला आहे.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशिल

(अ) या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून, ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेत जमिनीवर असून त्यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता	:-	निरंक
(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल	:-	निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, दापोली या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दापोली,
दिनांक २६ जून २०२५.

डॉ. विजयकुमार सुर्यवंशी,
उपविभागीय अधिकारी,
दापोली विभाग, दापोली.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिपळूण यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक कलम ११/एलएक्यू/एसआर/२१४/२०२१.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (११) च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) आणि मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांसकडील आदेश क्रमांक भूसं/समन्वय/कार्या-१/अधिकार प्रत्यार्पित/२०२१ दिनांक २ मार्च २०२१ अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी समुचित शासन उपविभागीय अधिकारी चिपळूण यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची–एक

जमिनीचे वर्णन

गावाचे नाव तळसर, ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी.

अनुक्रमांक (१)	गट नंबर (२)	संपादीत क्षेत्र (हे.आर.) (३)
१	२९ पै	०.०७.५०
२	३० पै	०.३८.००
३	३८ पै	०.५३.००
४	३९	०.०२.३०
५	४० पै	०.१४.००
६	४९ पै	०.००.५०
७	५० पै	०.११.००
८	५१ पै	०.४६.००
९	५२	०.१७.००
१०	५३	०.२०.००
११	५४	०.५२.९०
१२	५५	०.६३.७०
१३	५६	०.१५.४०
१४	५७ पै	०.४६.००
१५	५८	०.०५.६०
१६	५९ पै	०.६२.००
१७	६०	०.०९.९०
१८	६१	०.०२.३०
१९	६२ पै	०.०५.००
२०	६३ पै	०.०५.००
२१	६५ पै	०.०१.००
२२	६२२ पै	०.९६.००
२३	६२३ पै	०.१३.००
२४	६२४	०.१०.६०
२५	६२५	०.०४.००
२६	६२६	०.०८.२०
२७	६२७	०.०५.५०
२८	६२८ पै	०.४८.००

(१)	(२)	(३)
२९	७७६ पै	०.०५.००
३०	७७९ पै	०.१९.००
३१	७८० पै	०.१५.००
३२	७८२ पै	०.०२.००
३३	७८३	०.३१.००
३४	७८४	०.२८.००
३५	७८५	०.२०.००
३६	७८६ पै	०.४६.००
३७	७८७	०.०६.८०
३८	७८८	०.०३.८०
३९	७८९	०.०५.६०
४०	७९० पै	०.०८.६०
४१	७९१ पै	०.०२.००
४२	७९४ पै	०.१५.००
४३	७९५	०.१६.८०
४४	७९६	०.०५.००
४५	७९७	०.४८.००
४६	७९८	०.०७.६०
४७	७९९	०.१२.४०
४८	८००	०.०९.००
४९	८०१	०.१२.९०
५०	८०२	१.०६.००
५१	८०३	०.५८.००
५२	८०४ पै	०.१६.००
५३	८०५ पै	०.६६.००
५४	८०६ पै	०.०३.००
५५	८२३ पै	०.००.१०
५६	८२४ पै	०.०४.५०
५७	८४० पै	०.३०.००
५८	२२२५ पै	०.२६.००
	एकूण	**१२.९२.५०**

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	मौजे तळसर, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश पुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता यासाठी भूसंपादन.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:-	मौजे तळसर, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश पुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता यासाठी भूसंपादन करण्यासाठी १२.९२.५० हे.आर. क्षेत्र संपादित होणार आहे.
समाजाला मिळणारे लाभ	:-	भविष्यात नदी नाल्यांना, विहिरींना पाण्याचा स्त्रोत वाढेल. शेती बागायतींना धरणाच्या पाण्याचा फायदा होईल. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल.

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

निरंक

अनुसूची-चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)

या कार्यालयाचे पत्र क्र. भू.सं./एसआर-२१४/२०२२, दिनांक २७ जून २०२२ चे पत्राने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना अधिनियम, २०१३ अंतर्गत सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास (SIA) करणेसाठी भाकर सेवा संस्था, लांजा यांसकडे त्यांचेकडील पत्र क्रमांक एसआयए/६४६/२०२२, दिनांक १ जुलै २०२२ ने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल प्राप्त झाला आहे. सदरचे अहवालानुसार या प्रकल्पामुळे कोणतेही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नसलेबाबत अहवालात नमूद केलेले आहे.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

लागू नाही.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. त्याविरुद्ध आक्षेप नोंदविण्याचे असल्यास, प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, चिपळूण तथा भूसंपादन अधिकारी, चिपळूण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

टीप :- संपादित जमिनींच्या आराखड्यांचे उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिपळूण या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

चिपळूण,
दिनांक ८ जुलै २०२५.

आकाश लिगाडे,
उप विभागीय अधिकारी,
चिपळूण.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जुलै २०२५.

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीबी-४३२२/९९/प्र.क्र.१०६/२०२२/नवि-११.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आलेला आहे) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकारक्षेत्राकरिता (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आलेला आहे) नियोजन प्राधिकरण आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीबी-४३१७/६२९/प्र.क्र. १९८/२०१७/वियो/नवि-११, दिनांक ८ मे २०१८ (यापुढे याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना, २०३४ (यापुढे याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ ला (यापुढे याचा उल्लेख " उक्त नियमावली " असा करण्यात आला आहे) उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरूपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेत परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे ; आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुद्धीपत्रक दिनांक २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे ; आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुद्धीपत्रक व पुरकपत्र दिनांक २९ जून २०१८ रोजी पारित केले असून सदर शुद्धीपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दिनांक ३० जून २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे ; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दिनांक १ सप्टेंबर २०१८ पासून अंमलात आलेली आहे ;

